# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम    **P.S.(ठाणे):** रिसोड
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0639    **Year (वर्ष):** 2022
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/12/2022 23:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** शुक्रवार    **Date From (दिनांक पासून):** 02/12/2022
      **Time Period (कालावधी):** पहर 5    **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/12/2022
      **Time From (वेळेपासून):** 13:51 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 14:35 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 02/12/2022    **Time (वेळ):** 23:32 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 038
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/12/2022 23:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** स्टेट बँकजवळ हिंगोली नाका रिसो,रिसोड

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** परमेश्वर विठोबा सदार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1957

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खडकी सदार ,रिसोड,रिसोड ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खडकी सदार ,रिसोड,रिसोड ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7588091124

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रकाश कळणु धांडे पोलीस पाटील | | | 1. खडकी सदार,रिसोड,रिसोड , वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | आरोपी याने स्विकारलेली लाच रक्कम 500 रुपये दराचे 18 चलणी नोटा | 9,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

9,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद रिसोड दिनांक:-02.12.2022 माझे नांव - परमेश्वर विठोबा सदार, वय-65 वर्श, व्यवसाय-शेती रा.सदार खडकी ता.रिसोड जि.वाशिम, मो.नं.7588091124,8390683189 मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो व माझे कडे 12 एकर शेती असुन शेती करतो.दिनांक 30.11.2022 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय वाशम येथे मोबाईल फोनव्दारे संपर्क करुन पोलीस निरीक्षक श्री.भोसले यांचेकडे माझी लाच मागणी बाबत तक्रार सांगितली व कार्यवाही करीता देगांव ता.रिसोड येथे दि.01.12.2022 रोजी येण्याबाबत सांगितले. दिनांक 01.12.2022 रोजी पोलीस निरीक्षक भोसले,व स्टाफ असे खाजगी वाहनाने ग्राम देगाव येथील देवी मंदीरात आले. तिथे त्यांची भेट झाली. त्यानंतर आम्ही मंदीराचे परीसरात खाजगी वाहन उभे करुन वाहनामध्ये बसुन मला लिहीण्यास त्रास होत असल्याने माझी तक्रार मी सांगीतल्याप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली.

" मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो व माझे कडे 12 एकर शेती असुन शेती करतो. त्यापैकी 8 एकर शेती ओलीताखालील आहे. मला तीन मुले असुन मोठा मुलगा पंढरी परमेश्वर सदार, मधला मुलगा संतोश परमेश्वर सदार व लहान मुलगा रामेश्वर परमेश्वर सदार अशी आहेत. माझे मुले संतोष व रामेश्वर हे पुणे येथे कंपनीत कामाला आहेत.तर पंढरी हा माझे सोबत शेती करतो. शेतात विहीर आहे बोअरवेल आहे.शेतात गहु हरबरा पेरलेला असल्यामुळे शेताला पाणी देणे सुरु आहे. शेतात नियमित विजपुरवठा राहत नाही त्यामुळे माझा मुलगा पंढरी व आमचे गावचे लाईनमन निलेश शिंदे यांचे मध्ये शेतातील विजपुरवठा सुरळीत होत नसल्यामुळे वाद झाला होता. त्यामुळे लाईनमन शिंदे यांचे रिपोर्ट वरुन माझा मुलगा पंढरी परमेश्वर सदार यांचे विरुध्द पोलीस स्टेशन रिसोड येथे दिनांक 24.11.2022 रोजी अप क्र.621/2022 कलम 353,332, भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. त्यामुळे पोलीस स्टेशन रिसोड येथील पोलीस यांनी माझा मुलगा पंढरी याला पकडून नेले. त्याला जेल मध्ये टाकले आहे. सद्या तो वाशिम येथे जेल मध्ये आहे. मुलाचे जमानती करीता मी वाशिम चे कोर्टात वकीलामार्फत अर्ज केला आहे. त्यामध्ये 3 डिसेंबर तारीख आहे. दिनांक 29.11.2022 रोजी आमचे गावचे पोलीस पाटील प्रकाश कळणु धांडे हे सकाळी माझे घरी आले त्यानी मला सांगीतले कि, तुमच्या मुलाचे जमानती करीता रिसोड पोलीस स्टेशन कडुन कागदपत्रे लागतात. तुम्हाला लवकर कागदपत्रे पाहीजे असतील तर आपल्या गावचे बिट जमादार सलीम रेघीवाले यांना 20,000/-रु दयावे लागतील. ते पैसे माझे कडे दया मी त्यांना देतो. त्यामुळे मी खात्री करण्याकरीता काही वेळाने रिसोड पोलीस स्टेशनच्या सलीम रेघीवाले साहेबांना कागदपत्रे लवकर कोर्टात पाठविण्याकरीता भेटलो होतो. त्यांनी मला सांगीतले कि, तुम्हाला पोलीस पाटील यांनी निरोप दिला नाही काय. मी त्यांना सांगीतले कि मला निरोप मिळाला परंतु माझे कडून 20,000/-रु देणे शक्य नाही. त्यावर सलीम रेघीवाले पोलीस साहेब यांनी मला तुमच्या मुलाच्या जमानती करीता कागदपत्रे लवकर कोर्टात पाठवायची असतील तर मला कमीत कमी 15,000/-रु दयावे लागतील असे सांगीतले. माझा मुलगा वाशिम येथे जेल मध्ये असल्यामुळे मी नाईलाजास्तव पोलीस सलीम रेघीवाले साहेब यांना पैसे देण्याचे कबुल केले आहे. जमानती करीता कागदपत्रे कोर्टात पाठविण्याकरीता पैसे लागत नाहीत. पोलीस पाटील प्रकाश धांडे यांनी पोलीस स्टेशन येथील सलीम रेघीवाले साहेब यांचे करीता 20,000/- रुपयाची लाचेची मागणी केली आहे. पोलीस पाटील प्रकाश धांडे व पोलीस कर्मचारी सलीम रेघीवाले यांच्यावर कारवाही करावी या करीता तक्रार देत आहे.पोलीस स्टेशन येथील सलीम रेघीवाले साहेब व पोलीस पाटील प्रकाश धांडे यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुश्मनी नाही. कारवाही होण्यास विनंती आहे.

"..2.. पो.नि.भोसले यांनी मला पडताळणी कार्यवाही बाबत, तसेच मेमरी कार्ड व व्हाईस रेकॉर्डर चे कार्यप्रणाली बाबत समजावून सांगितले. सदर तक्रारीवरुन दि.01.12.2022 रोजी मला, पंच क्र.1 सह पोलीस पाटील प्रकाश धांडे यांचे भेटीकरीता व्हाईस रेकॉर्डर लावुन पाठवून पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये आमच्या भेटी दरम्यानचे संभाषण रेकार्ड झाले आहे. खडकी सदार येथे मी पोलीस पाटील प्रकाश धांडे यांचे घरी जावुन त्यांची भेट घेवून त्यांचे सोबत त्यांचे मोटार सायकलने रिसोड येथे पोलीस स्टेशनला येत

असतांना आमच्यामध्ये कामासंबंधाने बोलनी केली. त्यावेळी पोलीस पाटील प्रकाश धांडे यांनी मला किती पैसे देता सांगा त्याले ते कोर्टात दया लावतो डोक्युमेंट असे म्हटले असता मी पोलीस पाटील धांडे यांना किती द्यायचे सांगा तुम्ही असे म्हटले.पोलीस पाटील धांडे यांनी मला म्या म्हणले पाचंअन दहा हजारात काम होत नाही.. हे पाहा ते तुमच्यावर टाकलं नं म्या...बर किती देता मंग असे म्हटले. मी त्यांना त्याहचे किती आहेत बर अंदाज असे म्हटले असता पोलीस पाटील धांडे यांनी मला ते चाळीसच्या वर म्हणतात असे म्हटले. मी त्यांना चाळीस च्या वर का ... साहेब चाळीस तं लय होतात न हो असे म्हटले.पोलीस पाटील धांडे यांनी मला तुमचं म्हणंन म्हणलं किती देता तुम्ही असे म्हटले.मी त्यांना म्या म्हणलं दहाकं हजार रुपये देउ असे म्हटले.पोलीस पाटील धांडे यांनी मला विसच्या आतुन तुम्हालं कितीकं करुन दया मि तुमचं काम करतो.. असे म्हटले. मी त्यांना दहा हजार रुपये पहा पाटील करुन टाका बोला साहेबालं असे म्हटले असता पोलीस पाटील धांडे यांनी मला पैसे आधी खिशात आना असे म्हणुन पोलीस पाटील प्रकाश धांडे यांनी मला 10,000/-रु. लाच रक्कमची मागणी केली.त्यांनतर मी पोलीस सलीम रेघीवाले यांना पोलीस स्टेशन रिसोड येथे जावुन भेटलो असता त्यांनी मला पैशाची मागणी केली नाही. त्यांनतर मी प्रकाश धांडे पोलीस पाटील यांना अडत्याकडुन पैसे घेवुन येतो असे सांगुन कृषी उत्पन्न बाजार समिती च्या रोडने निघुन पुढे पंच क्र.1 सह वाशिम ते रिसोड रोड वरील मैदानात परत आलो. .

पोलीस पाटील प्रकाश धांडे यांनी पैसे घेवुन लगेच बोलाविले असल्याने मी पोलीस पाटील प्रकाश धांडे यांना लाच म्हणुन देण्याकरीता 10,000/-रूपये रक्कम हजर केली. त्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. पो.नि. भोसले साहेब यांनी सापळा कार्यवाही संबंधी मला व स्टाफ ला सुचना दिल्या. अल्ट्राव्हायोलेट लॅम्पचा प्रयोग करुन दाखविले. प्रकाश धांडे पोलीस पाटील यांनी रिसोड येथे लोणी फाट्यावरील जय भवानी नास्ता सेंटर व रेस्टॉरंट येथे भेटीकरीता बोलाविले असल्याने मला, पंच क्र.1 सह यांचे भेटीकरीता जय भवानी नास्ता सेंटर व रेस्टॉरंट लोणी फाटा येथे पाठवून जय भवानी नास्ता सेंटर व रेस्टॉरंट चे आजुबाजुला सापळा कारवाई आयोजीत करण्यात आली. दरम्यान प्रकाश धांडे पोलीस पाटील यांनी मला 10,000/-रु न मागता मला 9,000/-रु देण्यास सांगुन गावात आल्यावर पैसे देण्यास सांगुन लाच रक्कम न स्विकारता प्रकाश धांडे हे तेथुन निघुन गेले. त्यामुळे मी लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा न करता रेस्टॉरंट चे बाहेर निघुन आलो. त्यांनतर मी पो.नि भोसले यांना झालेला प्रकार पंचा समक्ष सांगीतला. तेथुन आम्ही सर्व सापळा पथकातील सर्व खडकी गावचे फाट्यावर गेल्यावर मी पोलीस पाटील प्रकाश धांडे यांना भेटण्याकरीता त्यांचे मोबाईलवर पंचा समक्ष संपर्क केला असता प्रकाश धांडे यांनी मला सांगीतले कि, ते बाहेर गावी जात आहे. उदया आल्यावर भेटू. त्यामुळे आज रोजीची सापळा कारवाई स्थगीत ठेवुन दया दि. 02.12.2022 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरले.

दिनांक 02.12.2022 रोजी ठरल्याप्रमाणे पो.नि.भोसले व पंच स्टाफ यांची रिसोड येथे कृषी उत्पन्न बाजार समिती येथे भेट झाली. पोहवा विनोद मारकंडे यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन कापडी पिशवींमध्ये टाकुन माझे शर्टाचे आतील बंडीला पिन करुन अटकावुन दिले. तसेच लाचेची रक्कम माझे शर्टाचे आतील बंडीचे खिशात टाकुन पोलीस पाटील प्रकाश धांडे यांना देण्याकरीता पाठविले. काही वेळातच पोलीस पाटील धांडे हे मोटार सायकलने जवळ आले. त्यानंतर मोटार सायकलवर बसुन मुख्य रस्त्याने स्टेट बँक जवळ हिंगोली नाका येथे गेलो. तिथे पोलीस पाटील धांडे यांनी मला दयान मंग माझ्या कडे पैशे असे म्हटले. मी पोलीस पाटील धांडे यांना साहेबा कडे जायच म्हणताना का नाही असे म्हटले. पोलीस पोटील धांडे यांनी मला होण मंग दयान माझ्या जवळ असे म्हटले असता मी त्यांना तिथ देले की इंथ देवु असे म्हटले असता

..3.. पोलीस पाटील धांडे यांनी मला इंथच दयान... साहेबा जवळ नाही इंथच दया पैशे...इंथ दया मंग काल पासुन म्हणालो पैशे माया जवळ लागतात असे म्हटले. मी त्यांना किती दयाचे तुम्हाला आता.. नऊ असे म्हटले असता त्यांनी मला नऊ हजार.. नऊ हजार असे म्हणुन माझे जवळुन प्रकाश धांडे यांनी 14.35 वा दरम्यान 9,000/-रु लाचेची रक्कम स्विकारली.. तेथुन आम्ही पोलीस स्टेशन रिसोडचे मागचे बाजुस आलो. पो.नि.भोसले, स्टाफ व पंच आमचे मागेमागे खाजगी वाहनाने पोलीस स्टेशन रिसोड चे आवारात पोहचले. तिथे पोहोचल्यावर मी पो.नि.भोसले यांना लाच रक्कम स्विकारल्याबाबतचा पुर्व नियोजित इशारा केला. सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी पोलीस पाटील प्रकाश कळणु धांडे यांना लाच रक्कम रु. 9000/- सह पंचासमक्ष रंगेहाथ पकडले.

दि.01.12.2022 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान खडकी सदार येथील पोलीस पाटील प्रकाश कळणु धांडे यांनी मला मुलाच्या जमानती करीता कागदपत्रे लवकर कोर्टात पाठविण्याकरीता 10,000/-रु. लाचेची मागणी करुन इतर लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचे आर्थीक फायदया करीता गैरमार्गाने लाचेची मागणी करुन दि. 02.12.2022 रोजी सापळा कारवाई दरम्यान स्टेट बँक जवळ हिंगोली नाका रिसोड येथे 14.35 वा दरम्यान माझे कडुन लाचेची रक्कम 9,000/-रु स्विकारली. म्हणुन माझी प्रकाश कळणु धांडे, वय-56 वर्ष, व्यवसाय शेती, पोलीस पाटील खडकी सदार रा.खडकी सदार ता.रिसोड जि.वाशिम यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद पो.हवा.राहुल व्यवहारे यांनी टंकलिखीत केली असुन मला वाचुन दाखविली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष सही (एम.के.भोसले) ( परमेष्वर विठोबा सदार ) पोलीस निरीक्षक, रा. खडकी सदार ता.रिसोड, जि.वाशिम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. अशाप्रकारचे फिर्यादीचे रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन पुढील तपासकामी मे पोनि सा यांचे आदेशाने पोनि महेश भोसले ला.प्र.वि वाशिम यांचेकडे देण्यात आला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Devendrasinh Bahadursinh Thakur(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

परमेश्वर विठोबा सदार

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Devendrasinh Bahac
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**